साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 34 वे

संस्थापक संपादक
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे

संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com |

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.९ | पाने-१६ | दि.८/३/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.







# राष्ट्रीय पशुधन अभियानात शेतकऱ्यांना शेळी-मेंढी पालनासाठी ५० लाखाचे अनुदान

## सहभागी होण्याचे आवाहन

करमाळा : केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेतकऱ्यांसाठी शेळी-मेंढी पालनासाठी १० ते ५० लाख रुपयाचे अनुदान शासनाकडून मिळत आहे. त्याचा लाभ तालुक्यातील शेतकऱ्यांनी घ्यावा; असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉ.एम.एच.यादव यांनी केले.

केंद्र शासनाच्या या योजनेमध्ये १ हजार अंड्यावरील कुक्कूट पक्षाचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यास २५ लाख रूपयाचे अनुदान दिले जाणार आहे. शेळी-मेंढीच्या १०० मादी व ५ नर यास १० लाख तसेच २०० मादी व १० नर यांना २० लाख अशाप्रकारे ५०० मादी व २५ नर यासाठी शासनाकडून ५० लाख रूपयाचे अनुदान दिले जात आहे. वराहपालनमध्ये ५० मादी व ५ नर यासाठी १५ लाख तर १०० मादी व १० नग यासाठी ३० लाखाचे अनुदान दिले जात आहे. याबरोबरच पशुखाद्य व वैरण याकरिताही ५० लाखापर्यंतचे अनुदान दिले जात आहे. याकरीता ऑनलाइन पोर्टल अर्ज करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर त्याची छाननी करून मंजुर थेट बँकेकडे पाठविला जातो. (पान ४ वर..)



उपचारापेक्षा प्रतिबंध बरा या उक्तीनुसार तालुक्यातील सर्व पशुपालकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या पशुंना लाळखुरकूत लसीकरण तसेच शेळ्या व मेंढ्यांना पीपीआर लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण आपल्या नजीकच्या पशुवैद्यकिय केंद्राशी संपर्क करण्यात यावा. तसेच राष्ट्रीय पशुधन अभियांनातर्गत ज्यांना सहभागी व्हायचे आहे त्यांनी संपर्क करावा.

..डॉ.एम.एच.यादव(पशुधन विकास अधिकारी करमाळा)



समाजातील निम्मा घटक बलशाली झालातर सर्वत्र विकास झाल्याशिवाय रहाणार नाही !

संपादकीय.............................................!

# महिला दिन की दीन

मार्च महिना सुरू झाला की ८ मार्चच्या निमित्ताने महिला दिनाचे वेध बहुर्तेकाना लागतात. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी सस्था, राजकर्ते हे महिला दिनाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करतात. यात काही महिलांचे सत्कार केले जातात, तर काही महिलांना पुरस्कारही दिला जातो पण पुढे वर्षभर काय..? हा खरा प्रश्‍न आहे.

राज्यात आणि देशात अनेक विक्षीप्त घटना घडत आहेत. त्यात महिला यांना अक्षरश: जाळून मारले जात आहे. महिलाची क्रुरपणे हत्या केल्या जात आहे. त्यामध्ये हैद्राबाद येथे पशूवैद्यकिय डॉक्टर तरूणीवर अत्याचार करून तीच्यावर पेट्रोल टाकून जाळले, त्यात ती मरण पावली. त्यातील संशयितांचा पुढे एन्कौंटर झाला. त्यानंतर देशभर सोशल मिडीयात हैद्राबाद पोलीसांचे कौतुक करण्यात आले. पुढे याच हैद्राबाद जवळ शमशानबाद जवळ मंदिराच्या पाठीमागे उघड्यावर एका जळालेल्या युवतीचा मृतदेह पोलीसांना सापडला होता.हिंगणघाट (वर्धा) येथे २४ वर्षाच्या शिक्षिकेला एकतर्फी प्रेमातून पेट्रोल टाकून पेटवले, त्यात ती तरूणी मरण पावली. अंधारी, ता.शिल्लोड येथे ५० वर्षाच्या महिलेला शेजाऱ्याने मध्यरात्री रॉकेल ओतून पेटवले, औरंगाबाद येथे उपचार सुरू असताना ही महिला मरण पावली. मुझफ्फरनगर येथे हुंड्यासाठी तरूणीला जाळले. नियोज नगरजवळ मंगेश रणसिंग व त्याची पत्नी रूक्मीनी या दोघांना रूक्मीनीचे वडील, भाऊ, चुलते यांनी पेटवले व त्यात रूक्मीनी मरण पावली. केरळ मधील थ्रीसुर येथे २२ वर्षाच्या इंजिनिअरींग शिक्षण घेत असलेल्या युवतीवरही पेट्रोल टाकून जाळले. कोपर्डी प्रकरणाने तर अख्खा महाराष्ट्र पेटला होता. त्यातील नराधम आरोपी कायद्यातील त्रुटीमुळे अपील दाखल करून शिक्षा टाळत होते.यातल्या एका आरोपीने १०/९/२०२३ ला पुणे जेलमध्ये कोठडीत फास घेऊन जीवनयात्रा संपवली. दिल्लीतील निर्भया प्रकरण २०१२ ला घडले. सर्व न्यायालयाने या चौघांना फाशी देवूनही ते नराधमही नव्या नव्या युक्त्या काढून फाशी लांबवत होते. अशा अनेक घटना घडलेल्या आहेत, त्याची खुप मोठी यादी होईल. नुकत्याच रेल्वेच्या अहवालानुसार गेल्या दोन वर्षात धावत्या रेल्वेत १६५ महिलावर बलात्कार झाले आहेत. भर गर्दीत असे प्रकार होतात तर आडरानात घडलेले प्रकार समोर कसे येतील?. कायदे कठोर करूनही हे विकृत लोक कायद्यातील पळवाटा शोधून काढतात. त्यामुळे जनमाणसात तीव्र संताप आहे. याबाबीचा अतिरेक झाला तर नागपूरसारखे प्रकरण घडते. नागपूर येथे अक्कू यादव नावाच्या एक गुंडावर खुन, मारामाऱ्या, बलात्कार, महिलांचे विनयभंग असे गुन्हे दाखल होते. तो सतत गुन्हा करायचा त्याच्यावर गुन्हा दाखल झाला की तो जामीनावर सुटायचा आणि फिर्यादि देणाऱ्यांवर पुन्हा अत्याचार करायचा. त्यामुळे स्थानिक महिला प्रचंड चिडल्या होत्या. अशाच एक प्रकरणात अक्कु यादव २००४ ला जेल मध्ये गेला. त्यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल झाला. पोलीसांनी त्याला अटक केली. त्यानंतर त्याला घेऊन पोलीस` नागपूर येथील न्यायालयात १३ ऑगष्ट २००४ रोजी दुपारी आले. त्यावेळी तेथे आगोदरच जवळपास २०० महिला न्यायालयात दबा धरून बसल्या होत्या. त्याला फक्त दोन पोलीस घेऊन आले होते. पोलीस यंत्रणा गाहाळ होती. अक्कू यादवला आणलेले पाहताच या महिला एकदम धावून आल्या. कोणाला काही समजायच्या आतच त्यांनी भर न्यायालयात अक्कू यादव याचा दगड व हत्यारांनी ठेचून खुन केला आणि त्याचा मृतदेह न्यायाधीशाच्या खुर्चीच्या मागे फेकला. एवढ्यावरच या महिला थांबल्या नाहीतर त्यांनी आरोपीचे घर गाठले व त्याचे घर पेटवून दिले.या घटनेमागे एकमेव कारण म्हणजे धिमी पोलीस यंत्रणा व न्यायलयातील दिरंगाईपणा हे आहे. विशेष म्हणजे या प्रकरणी २१ महिलावर गुन्हा दाखल झाला होता. चौकशीत त्या महिला निर्दोष सुटल्या.

वरील घटनाप्रमाणेच गेल्या काही वर्षात छोट्या-छोट्या बालीकेवर लैंगीक अत्याचाराचे प्रमाण खुप वाढले आहे. खरंतर हे अत्याचार करणारे बाहेरचे नसतात जवळचे, विशेषत: नात्यातलेच असतात, संपर्कातील असतात. आजोबा, वडील, भाऊ हे लोक अत्याचार करत असतील तर काय बोलणार..? दुसऱ्या बाजुला काही महिलांची फसवणूक करून त्यांच्यावर अत्याचार केले जातात. तिथेसुध्दा बहुतांशी लोक ओळखीचे असतात किंवा ज्यांच्यावर महिला अत्याचार केले जातात. तिथेसुध्दा बहुतांशी लोक ओळखीचे असतात किंवा ज्यांच्यावर महिला अवलंबून असतात असे लोक असतात. खरंतर अत्याचार कोणीही करो, त्या महिलेचे जीवन उध्वस्थ होते. महिलांची चुक नसुनही त्यांचे भविष्य बरबाद होते.समाज तीच्याबद्दल नेहमीच नको ते बोलतो. थोडक्यात तीचं जगणं एका प्रसंगान लुळं पागंळं होवनू जातं . हे शासनाच्या लक्षात आल्यावर शासनाने 'मनोधैर्य योजना' सुरू केली आहे. त्यानुसार बलात्कार किंवा ॲसीड हल्ला झालेल्या महिलेला सावरणेसाठी त्यांना मानसिक आधार व वैद्यकिय मदत व आर्थिक सहकार्य देणे गरजेचे असते. त्यानुसार या योजनेनुसार शासन महिलेला दोन लाख रूपये रोख मदत करते ,काही विशेष प्रसंगी तीन लाख रूपये रोख मदत करते .एवढेच नाहीतर त्यासाठी निवारा, समुपदेशन, वैद्यकिय उपचार,कायदेशीर मदत, शिक्षण आणि व्यवसायीक प्रशिक्षण दिले जाते. 'उज्वला' ही योजना अशाच प्रकारची आहे. ज्या मुली किंवा महिला यांना लैंगिक कारणासाठी पळवून नेले होते व त्यांची सुटका झाली अशा महिलासाठी आहे. यामध्ये अशा मुली अथवा महिलांचे मानसिक खच्चीकरण होऊ नये व त्यांचे मन प्रबळ व्हावे यासाठी कार्यशाळा घेऊन , संपर्क साधून, विविध माध्यमातून प्रबोधन केले जाते. अशा मुलीला अथवा महिलेला सुरक्षित ठिकाणी ठेवले जाते. तीला तात्काळ सर्व प्रकारच्या अन्न,वस्त्र, निवारा अशा सुविधा दिल्या जातात. या योजनेव्दारे असे प्रकार घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही, असा प्रकार कोणा महिलेवर झाल्यास तीची तात्काळ सुटका करण्याचा प्रयत्न, सुटका झाल्यानंतर पुनर्वसन, त्यानंतर संबधित महिलांना पुर्ववत सन्मान प्राप्त करून देणे व समाजाचा अधार मिळवून देणे अशी कामे केली जातात.

एवढेच नाहीतर निराश्रीत महिलासाठी शासन १८ ते ६० वयो गट तसेच किशेरवयीन माता,अत्याचार पिडीत महिला, यांच्यासाठी महिला गृहे उभारली असून त्यांची राहण्या खाण्याची मोफत सोय केली जाते. देवदासी महिलांना शासन निर्वाहभत्ता तर देते पण त्यांच्या मुलीच्या लग्नाला अनुदानही देते. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आनुदान देते व वस्तीगृहाची सोय करते. ज्या अनाथलयात, अथवा महिला स्विकृती गृह किंवा संरक्षित गृहे येथील महिलांच्या मुलीच्या लग्नाला शासन अनुदान देते. दुसरी एक शुभमंगल विवाह योजना आहे. त्यामध्ये निराश्रीत आणि विधवा मुलीच्या विवाहाला १८ वर्षाची पुर्ण झाल्यानंतर अनुदान देण्यात येतेपण अन्य योजनेतून त्या मुलीला अनुदान मिळत असेलतर हे अनुदान मिळत नाही. याबरोबरच राज्य शासनाने ८ मार्च २०१५ पासून महिला आणि बालक विकास विभागाने 'माझी कन्या भाग्यश्री' ही योजना जाहीर केली. त्यानुसार मुलगी जन्माला आली, की तिच्या नावावर शासन ५० हजार रूपये टाकते.वयाच्या १८ नंतर तीला एक लाख रूपये मिळतात.त्यासाठी त्या मुलीला किमान दहावी पास होणे व अविवाहित असणे गरजेचे आहे. या अटीवर १८ वर्षानंतर तीला एक लाख रूपये मिळतात.जर एकाच घरात दोन मुली असतील तर तीच योजना २५ हजार रूपये टाकून १८ वर्षानंतर ५०-५० हजार रूपये दिले जाण्याची योजना आहे. महिला व बालकांसाठी असे काम करणाऱ्या समाजसेवी संस्थांना शासनाने अनुदानाच्या अनेक योजना जाहीर केल्या आहेत. अशा एक ना अनेक योजना कार्यरत आहे. पण समाजातील बदललेलं चित्र दुरूस्त होण्याची गरज आहे.

महिला हा समाजातील निम्मा घटक आहे . हजारो वर्षापासून महिलांचा हा घटक अजुनही मागे राहिला आहे. शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहेत पण काही लोकांची मानसिकता त्यासाठी पोषक नाही. अनेकजण महिलांची जागा चुल व मुल एवढीच ठेवत आहेत. यासाठी आजच्या मुली स्वयंभू बनण्यासाठी त्यांच्या मातांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यांनी स्वत:ला संधी मिळाली नाही पण माझ्या मुलींना मी संधी मिळवून देईन याचा विचार करून मुलीवर तसे संस्कार करून त्यांना घडवण्याची गरज आहे. त्यानुसार अनेक पालक तसे प्रयत्न करत आहेत. पण समाजात घडणाऱ्या या घटणामुळे सर्वत्र निराश निर्माण झाली आहे. अलीकडे शिक्षण चालू असताना काही फालतू प्रेमप्रकरणे यात अडसर बनत आहेत. या करिता मुलींना घरातून आपले करिअर महत्वाचे आहे, असे संस्कार करण्याची गरज आहे. याशिवाय समाजातील मुलांना मुलीचा, महिलांचा आदर राखण्याचा संस्कार केला पाहिजे. समाजातील विस्कटलेली स्थिती नीट बसवण्यासाठी कायद्या बरोबरच प्रबोधन महत्वाचे आहे. सोशलमिडीया, इंटरनेट, इलेक्टॉनीक माध्यमे या पिढीला बिघडवतात, पण खरं तर या माध्यमानीही ही पिढी बदलवता येईल. त्यावरही लक्ष देण्याची गरज आहे. देशाच्या सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु भारतीय वायुसेनेतील अधिकारी एअर मार्शल साधना सक्सेना नायर, वयाच्या २२ वर्षी आय.ए.एस. झालेल्या स्मिता सभरवाल, आय.ए.एस. होण्यापुर्वी मिळालेल्या १५ नोकऱ्या नाकारणाऱ्या तृप्ती भट,आदिवासी परिवारातील आय.ए.एस. श्रीधन्या सुरेश, सोशल मिडीयावर आपले व्हिडीओ टाकून वर्षाला करोडो रूपये मिळवणारी गुजरातची सोफीया अन्सारी,अशा अनेक तरूणी व महिला या अन्य महिलांच्या आदर्श आहेत. पण हे अपवाद पाहून समाजातील विचार बदलले तरच कर्तबार युवतींचा देश म्हणूनही आपली ओळख होईल. तरच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा केल्यासारखे होईल.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


(माजी नगरसेवक)
श्री.विजयराव चांदगुडे
श्री.रमेश चांदगुडे
विकासप्रिय आमदार
सावंत गटाचे युवा नेते
श्री.सुनील(बापू) सावंत
यांना वाढदिवसानिमित्त...
हार्दिक शुभेच्छा
१२ मार्च
शुभेच्छुक
● कमलाभवानी मजूर सहकारी संस्था मर्या;
श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा.
● विश्वगिरी सेवाभावी मंडळ, करमाळा.
● बाहेर तालीम सेवाभावी मंडळ, करमाळा.
● मारूती देवस्थान, भवानीपेठ
● शिवबा ग्रुप, भवानीपेठ, करमाळा.
ओंकार चांदगुडे
बालाजी चांदगुडे

पान १ वरून पुढे...

## राष्ट्रीय पशुधन अभियानात शेतकऱ्यांना शेळी-मेंढी पालनासाठी ५० लाखाचे अनुदान

बँकेने कर्ज पुरवठ्याची हमी दिल्यानंतर राज्यस्तरीय कार्यकारिणीसमोर या प्रस्तावास मंजुरी दिली जाते. त्यानंतर केंद्रशासनाच्या मंजुरीस्तव हे प्रकरण जाते. सदरची मंजुरी आल्यानंतर हे अनुदान शेतकऱ्याच्या बँकेच्या खात्यात जमा केले जाते. त्यामुळे या योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे; असेही आवाहन डॉ.यादव यांनी केले आहे.

### रिक्त कर्मचाऱ्यांमुळे अडचणी

करमाळा तालुक्यात श्रेणी-१ चे ९ पशुवैद्यकिय दवाखाने आहेत. तर श्रेणी-२ चे ९ दवाखाने आहेत. यात १० पशुधन विकास अधिकारी पदे मंजुर आहेत. पैकी ३ पदे रिक्त आहेत. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ३ पदे मंजूर आहेत तर १ पद रिक्त आहे. पशुधन पर्यवेक्षक १५ पदे मंजूर आहेत तर ४ पदे रिक्त आहेत. २१ परिचर पदे मंजूर आहेत. त्यापैकी ९ पदे रिक्त आहेत. एकूण ५३ पदापैकी १७ पदे रिक्त आहेत. सध्या इमारतीचा प्रश्न नाही. तालुक्यात ५८ हजार ३२७ गायी असून ५ हजार ७०९ बैल आहेत. तर २६ हजार ७६२ म्हैस असून ७०२ रेडी आहेत. याशिवाय शेळी- मेंढी, डुकरे व कुकूटपालन वेगळे आहे. या सर्वांसाठी पशुवैद्यकिय दवाखान्यात उपचार केले जातात.

## रत्नमाला होरणे यांना 'कृतिनिष्ठ शिक्षक' पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा शिक्षक समिती व छत्रपती परिवार मरवडे यांचे संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा कृतीनिष्ठ शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कंदर येथील शिक्षिका रत्नमाला होरणे यांना नुकताच प्रदान करण्यात आला. रत्नमाला होरणे यांची विद्यार्थीप्रिय, उपक्रमशील, साहित्यिक, समाजप्रिय शिक्षिका म्हणून ओळख आहे. त्यांनी शाळेमध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले असून त्यांचे सामाजिक, शैक्षणिक साहित्य क्षेत्रामध्ये भरीव योगदान आहे. या उत्कृष्ट कार्याची दखल घेत होरणे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यापूर्वी रत्नमाला होरणे यांना विविध तालुकास्तरीय जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत. पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे विविध क्षेत्रांमधून कौतूक केले जात आहे.

गटविकास अधिकारी मनोज राऊत, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस प्रताप काळे, अल्पसंख्यांक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शेख, केंद्रप्रमुख साई देवकर, मुख्याध्यापिका साळुंखे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब मुलाणी, सर्व सदस्य, सरपंच मौला मुलाणी, उपसरपंच अमर भांगे व ग्रामस्थ यांनी रत्नमाला होरणे यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## गीता पठण स्पर्धेत वीणा देवी यांनी पटकाविले प्रथम क्रमांकाचे बक्षीस



करमाळा(सं.प्र.) :श्री श्री जगद्गुरू शंकाराचार्य महासंस्थानम् दक्षिणाम्नाय श्री शारदापीठम्, श्रृंगेरी या संस्थेच्या २५ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या गीता ज्ञानयज्ञ : १८ अध्यायांची संपूर्ण गीता पठण स्पर्धेत करमाळा येथील वीणा बाळकृष्ण देवी यांनी प्रथम क्रमांकाचे २१ हजार रूपयांचे रोख बक्षीस व प्रशस्तीपत्रक पटकाविले आहे. सौ.देवी यांनी मिळवलेल्या यशाबद्दल करमाळा येथील महिला संघटनेने त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अँन्ड हार्डवेअर
- प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
- हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

## मुकबधीर शाळेत मिष्टान्न देऊन शिवार्थ मुटके याचा वाढदिवस साजरा



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देऊन कुंभेज येथील शिवार्थ अमोल मुटके याचा वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी विदर्भ कोकण बँकेचे गणेश शिंदे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. यावेळी कुंभेजचे उपसरपंच संजय तोरमल, माजी सरपंच दादासाहेब चौगुले, चेअरमन युवराज भोसले, ज्योतिर्लिंग मंगल कार्यालयाचे मालक कुमार कादगे, नवनाथ तोरमल, सतीश भोसले तसेच विद्यालयाचे सहशिक्षक परबत उपस्थित होते.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
जागतिक महिला दिन व महाशिवरात्रीनिमित्त अनेक वस्तूंवर
डिस्काउंट ऑफर
विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे
उपवासाचे पदार्थ
खजुर । शेंगदाणे । शाबुदाणा । बा.इस्टंट शाबुदाणा । भगर । शेंगतेल ।
राजगिरा लाडू व वडी । गुळाची शेंगदाणा, मिक्स, पिनट बटर चिक्की ।
गुलकंद राजगिरा वडी व रोल । तिखट व मीठाचे केळी व बटाटा चिप्स्
तिखट व गोड नायलॉन शाबुदाणा व बटाटा चिवडा । बटाटा चिलीमीली ।
खारे शेंगदाणे । नारळपाणी गोड शेंगदाणे । उपवास लिंबू लोणचे ।
उपवासासाठी पीठ
भगर पीठ, शिंगाडा पीठ
राजगिरा पीठ
उपवास भाजणी इ.
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या छापील किंमतीवर 10% डिस्काउंट
तळण्यासाठी...
बटाटा पापड, भगर पापड, बटाटा खीस, स्क्रु
बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स, शाबुदाणा पापडी
कच्चा नायलॉन शाबुदाणा, शाबुदाणा बॉबी इ.
सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी 390 रू. किंमतीचा
टाटा प्रिमियम चहा १ किलो पॅक डिस्काऊंट दरात फक्त 299 रू. मध्ये
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अँन्ड स्वीटस् । बेकरी अँन्ड मिल्क प्रॉडक्टस् ।
। नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अँन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# मांगी एमआयडीच्या प्लॉटचे दर कमी करावे : ॲड.शिवराज जगताप



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील मांगी रोडला असणारी एमआयडीसी प्लॉटचे दर कमी करण्यात यावे; अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष ॲड.शिवराज जगताप यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट संस्थापक खासदार शरद पवार यांना ॲड.जगताप यांनी निवेदन देऊन वरीलप्रमाणे मागणी केली आहे. निवेदनात ॲड.जगताप म्हणाले, की औद्योगिक वसाहतीची जागा गेली २५ ते ३० वर्षापूर्वी अधिग्रहित एक्वायर करण्यात आलेली आहे. शासनाने काही दिवसापासून प्लॉट विक्री संदर्भात प्रक्रिया सुरू की होती. परंतु याबाबत उद्योजकांमध्ये उदासीनता दिसून येत आहे. कारण की ज्या पध्दतीने शासनाने प्लॉटचे दर काढलेले आहेत, ते दर अवाजवी चढ्या भावाने असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील इतर औद्योगिक संस्था यांचे दर पाहिले तर करमाळा औद्योगिक वसाहत व इतर औद्योगिक वसाहती मध्ये जमीन आसमानचा फरक दिसून येतो. याबाबत अनेक वेळा दर कमी करण्याबाबत मागणी झालेली आहे. परंतु शासनाने याकडे गांभीर्याने पाहिलेले नाही. अनेक उद्योजक सुशिक्षित बेरोजगारांना औद्योगिक वसाहती मध्ये आपल्या उद्योगाची उभारणी करावयाची आहे, परंतु गेले अनेक वर्षापासून प्लॉट विक्रीचे दर पाहिले असता कोणताही उद्योजक इकडे फिरकत नाही. याबाबत गांभीर्याने विचार करून प्लॉटचे दर कमी करावेत. याबाबत करमाळा राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी यांनी शरद पवार यांना शिष्टमंडळाद्वारे भेट दिल्यानंतर ते म्हणाले, की याबाबत उद्योग मंत्र्याशी बोलून बैठक लावण्यात येईल; असे आश्वासन दिले. यावेळी मकाईचे माजी चेअरमन आप्पासाहेब झांजुर्णे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष हनुमंत मांढरे, रामवाडीचे सरपंच गौरव झांजुर्णे, शहर खजिनदार अरूण टांगडे, शहर उपाध्यक्ष आझाद शेख, संतोष वारगड, सरचिटणीस जावेद शेख आदीजण उपस्थित होते.

# करमाळा शहरातील विकासकामासाठी दीड कोटी मंजूर : महेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील विविध कामासाठी जवळपास दीड कोटी रूपये मंजूर झाले असून यातील ८० लाख रूपयाचे कामाचे टेंडर ओपन झाले असून ७० लाख रूपयांची कामे आठ दिवसात प्रशासकीय मंजूर होऊन येतील; अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

या निधीमधून भीमनगर येथे व्यायाम शाळा बांधणे (२९ लाख ७४ हजार), कानाडगल्ली येथे ठिकठिकाणी गटारीचे काम (४२ लाख २६ हजार), बारा बंगले येथे ओपन पेस मध्ये ब्लॉक बसवणे (९ लाख ९५ हजार), शितोळे घर ते गणपती मंदिर गटार बांधकाम (८ लाख ८९ हजार), रंभापुरा चौक परिसर सुशोभिकरण व रस्ता करणे (११ लाख ९९ हजार), गादीया घर ते नेटके हॉस्पिटल रस्ता करणे (४९ लाख ७६ हजार) आदी कामे केली जाणार आहेत. यापूर्वी करमाळा शहरासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून जवळपास १३ कोटी निधी मंजूर झालेला होता. शिवाय करमाळा शहरातील भुयारी गटार योजना व केंद्र शासनाच्या अमृत जल योजना दूषित पाणी शुध्दीकरण प्रकल्पासाठी जवळपास १६० कोटी रूपयांचा प्रस्तावही दाखल आहे; अशी माहिती चिवटे यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून करमाळा शहराला भरघोस निधी मिळत असल्यामुळे शहरवासियांनी समाधान व्यक्त केले आहे.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू**

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर–बारामती–सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)**
आता आपल्या **करमाळ्यात !**
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी बालसाहित्याची गरज : डॉ.वर्षा करंजकर



करमाळा(सं.प्र.) : आजच्या आधुनिक युगात वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी बालसाहित्याची खरी गरज आहे; असे प्रतिपादन बालरोगतज्ञ डॉ.वर्षा करंजकर यांनी केले.

मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त साहित्यिका अंजली श्रीवास्तव लिखित 'छोटुली सिआरा' या बालकाव्य संग्रहाचे नुकतेच प्रकाशन झाले. त्याप्रसंगी डॉ.वर्षा करंजकर बोलत होत्या. पुढे बोलताना डॉ.करंजकर यांनी कुठल्याही कार्यक्रमात शाल, श्रीफळ भेटवस्तू देण्याऐवजी पुस्तके भेट देऊन वाचन संस्कृती वाढवली पाहिजे; असे सांगितले. या बालकाव्य संग्रहाचे प्रकाशन स्नेहालय इंग्लीश स्कुल मधील ऊसतोडणी कामगारांची मुले (ओम शंकर वाघ, प्रविण शंकर वाघ), कोरोनामध्ये वडील गमावलेली मुले (राहतअली इक्बाल शेख, स्वरांजली जाधव) तसेच शाळेतील (लीला गणेश करे–पाटील, श्रावणी सागर कांबळे, समृध्दी ाकंबळे, साद घोडके, श्रेयस पवार) विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. शेताच्या बांधावर निसर्गाच्या सान्निध्यात व अवांतर खर्चाला कात्री मारत माझ्या नातीच्या नावाचं शीर्षक देऊन 'छोटुली सिआरा' हा माझा बालकाव्यसंग्रह मी विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रकाशित केला. तसेच ऊसतोडणी कामगारांची मुलं आणि कोरोना काळात आई–वडील गमावलेल्या छोट्या दोस्तांना सदर पुस्तक मी प्रेमपूर्वक अर्पण केले आहे; असे अंजली श्रीवास्तव यांनी सांगितले.

सदर कार्यक्रमास एलिझाबेथ आसादे, शितल करे–पाटील, स्नेहालयाच्या सचिव धनश्री दळवी, डॉ.कविता कांबळे, जयश्री वीर, उषा बलदोटा, पुष्पा लुंकड, सुरेखा घाडगे, ज्योती पांढरे इ. उपस्थित होते

तोच विश्वास, तीच सेवा
**आनंद ड्रायफ्रुटस् & गरम मसाला**
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
Anand Dryfruit
• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रदाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट
केक भांडी, चॉकलेट क्रंची, टर्निंग टेबल नोजल रशियन आईस्क्रिमचे सर्व साहित्य तसेच केक व वाढदिवस डेकोरेशन सजावट साहित्य मिळेल !
एकवेळ अवश्य भेट द्या..!



एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

**पुनम एजन्सी**
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.



जशी वेळ निघून जाईल..,तशी जखम सुध्दा भरून येईल !
पण.. आयुष्यभर येणाऱ्या तुमच्या आठवणींना कुठलीच तोड नाही.
भई.. तुमच्या योग्य मार्गदर्शनाचे व आठवणींचे झरे इतके की..
त्यापुढे आज आम्हाला साखरही गोड नाही..!
साखरही गोड नाही..!!

आदिनाथ कारखान्याचे माजी चेअरमन, माजी नगराध्यक्ष
करमाळा अर्बन बँकेचे माजी चेअरमन , करमाळा भूषण व आमचे मार्गदर्शक
**कै.गिरधरदास देवी (भई)** यांच्या पवित्र स्मृतीस
**विनम्र अभिवादन !**

अभिवादक
**शंकर आजिनाथ घनवट • सचिन रमणलाल कटारिया**
करमाळा, जि.सोलापूर




सावंत गटाचे नेते
**श्री.सुनील(बापू) सावंत**
यांना १२ मार्च रोजी असलेल्या
**वाढदिवसास हार्दिक शुभेच्छा !**

**बनकर कुशन ॲन्ड टायर्स**
पोथरनाका, करमाळा.
प्रोप्रा : रामचंद्र बनकर
(9960191567)

# एस.एस.के.एस. असोसिएट्स्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)
**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)
**पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टसमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.**
टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

Director



श्री.कन्हैय्यालालजी देवी

रोजच्या आयुष्यात खूप माणसे
येतात अन् जातात...
त्यातील मात्र काहीच कायमची
मनात राहतात...
जी खूप काही शिकवून जातात
अमूल्य क्षण देऊन जातात
खरंच काही माणसं कायमची
स्मरणात राहतात...!



दि करमाळा अर्बन को.ऑप. बँकेचे माजी चेअरमन
माजी नगराध्यक्ष व करमाळा भूषण
**कै.गिरधरदास देवी (भई)**
यांच्या १० मार्च रोजी असलेल्या पुण्यस्मरणदिनानिमित्त
भावपूर्ण आदरांजली तसेच ११ मार्च रोजी असलेल्या
जयंतीनिमित्त आपल्या पवित्र स्मृतीस...

विनम्र अभिवादन

अभिवादक
श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित
**नवभारत इंग्लीश मेडियम स्कूल व ट्विंकलींग स्टार्स, करमाळा.**
संचालक : अमोद संचेती, चंद्रकांत देवी, कन्हैयालाल देवी, विजय दोशी, सौ.सुनिता देवी
मुख्याध्यापिका - सौ.सुनिता मोहिते मॅडम सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी वृंद

# करमाळा अर्बन बँकेची आर्थिक स्थिती प्रगतीपथावर



करमाळा(सं.प्र.) : करमाळा अर्बन बँकेची आर्थिक स्थिती प्रगती पथावर आहे; अशी माहिती प्रशासक विष्णूपंत डोके यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये दिली आहे.

करमाळा अर्बन बँकेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २९ जुलै २०२२ रोजी आर्थिक निर्बंध लावल्याने बँकेचे सर्व आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते. आर्थिक व्यवहार ठप्प झाल्याने बँकेवर २१ एप्रिल २०२३ रोजी दिलीप तिजोरे यांची प्रशासक पदी नेमणूक करण्यात आली होती. दिलीप तिजोरे यांच्या बदलीनंतर विष्णुपंत डोके यांनी बँकेच्या प्रशासक पदाचा पदभार घेताच, बँकेची थकबाकी वसुली करणेकामी कडक धोरण अवलंबून थकीत कर्जदारावर स्थावर जप्तीसारखी कायदेशीर कार्यवाही करून कर्जदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन कर्जदारांना कर्ज रक्कम भरणेकामी प्रवृत्त केले. बँकेची थकबाकी वसुल करणेकामी डोके यांनी १३ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाची एक रकमी कर्जफेड योजना स्विकारली. त्यानंतर २९ फेब्रुवारी २०२४ अखेर ९५ कर्जखाती बंद करून २ कोटी ६ लाख ९४ हजार रूपये रकमेची वसुली केलेली असल्याने बँकेच्या व्याज उत्पन्नात वाढ झालेली आहे.

आज अखेर अर्बन बँकेकडे रोख स्वरूपात शिल्लक रक्कम रूपये ३६ कोटी १२ लाख १७ हजार आहेत. त्यामुळे ठेवीदारांनी घाबरून जाण्याचे कारण नसून अफवांवर विश्वास ठेवू नये. बँकेकडे असलेल्या ठेवींना विमा सुरक्षा असल्याने बँकेतील ठेवी सुरक्षित असून ठेवीदारांनी निश्चिंत रहावे. रिझर्व्ह

**बँकेच्या आर्थिक प्रगतीचा तपशील**
**(दि.२९/२/२०२४ अखेर, आकडे लाखात)**

| | |
|---|---|
| ठेवी | – ३८८९.३१ |
| कर्ज | – १००१.८८ |
| बँकेकडे असलेली शिल्लक | – ३६१२.१७ |
| एन.पी.ए.ग्रॉस | – ६५४.८८ |
| एन.पी.ए.नेट | – ०००% |
| नेट वर्थ | – +१५८.५८ |
| वाढलेले शेअर्स | – १५७.०० |
| एकुण भागभांडवल | – १३५०.१७ |
| सी.आर.ए.आर | – +६६.८९% |

बँकेने ठरवून दिलेले वसुलीचे उद्दीष्ट या बँकेने मोठ्या स्वरूपात पूर्णत्वास नेल्याने लवकरच बँकेवरील निर्बंध शिथिल होऊन आर्थिक व्यवहार पूर्वपदावर येऊन सर्वसामान्यांची बँक म्हणून पूर्वीसारखीच सुरळीत सुरु होईल. करमाळा अर्बन बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी सांगितलेल्या सूचना व त्यांच्या नियमांना अनुसरून बँकेची प्रगती केलेली असल्याने बँकेवरील निर्बंध कमी करणेकामी रिझर्व्ह बँकेस करमाळा अर्बन बँकेने केलेले सहकार्य प्रगतीच्या आलेखावरून कळणार असल्याचे प्रशासक डोके यांनी सांगितले.

ठेवीदारांनी बँकेत ठेवलेल्या ठेवीतूनच गरजू कर्जदारांना कर्ज वाटप केले जाते. थकीत कर्जदारांनी लवकरात लवकर आपल्याकडील थकीत कर्जाचा भरणा बँकेत करून बँकेची थकबाकी कमी करण्यास हातभार लावावा. अन्यथा नाईलाजाने कर्जासाठी आपण दिलेल्या तारण मालमत्तेचा जाहीर लिलाव करून बँकेची थकबाकी आम्हाला वसुल करावी लागेल; असे व्यवस्थापक प्रकाश क्षीरसागर यांनी सांगितले.

# रामकृष्ण माने यांना राज्यस्तरीय म.फुले सामाजिक पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : येथील भटके विमुक्त जाती व आदिवासी ज्ञानपीठ स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण माने यांना सत्यशोधक मुक्ता साळवे साहित्य परिषद, सोलापूरच्या वतीने शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्यस्तरीय 'महात्मा फुले सामाजिक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सोलापूर येथे डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित सहाव्या सत्यशोधक मुक्ता साळवे साहित्य व सांस्कृतिक संमेलनात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक दत्ता गायकवाड यांचे हस्ते सन्मानचिन्ह देवून रामकृष्ण माने यांना सन्मानित करण्यात आले. मिळालेल्या पुरस्काराबद्दल माने यांचे अभिनंदन होत आहे.






# करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस नूतन कार्यकारिणी जाहीर



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ची नूतन कार्यकारिणी तालुका अध्यक्ष भरत आवताडे यांनी नुकतीच जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका उपाध्यक्ष पदी उदय ढेरे (वीट), अमोल भोसले (निमगाव), देवा लोंढे (करमाळा) व सोमनाथ रोकडे (वांगी नं.३) यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सरचिटणीस पदी अमोल फरतडे (हिवरे), चिटणीस पदी चंद्रकांत जगदाळे (हिसरे), प्रवक्ता पदी डॉ.गोरख गुळवे (टाकळी), खजिनदार पदी गणेश गुंडगिरे (पारेवाडी), सचिव पदी विशाल सरडे (सोगाव पश्चिम), सहसचिव पदी प्रशांत शेंडे (घोटी), प्रसिध्दी प्रमुख पदी अमोल चाळक (फिसरे) तर कार्यकारिणी सदस्य म्हणून रविंद्र नवले (पारेवाडी) यांची निवड करण्यात आली. या सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार तालुका अध्यक्ष भरत आवताडे यांनी केला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे; असे आवाहन आवताडे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना केले. यावेळी जिल्हा राष्ट्रवादी युवकचे अभिषेक आवाड यांचेसह बहुसंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बार्शी येथील सुप्रसिध्द न्युरोसर्जन
**डॉ.किशोर उध्दवराव गोडगे**
MBBS.MS.Mch (neurosurgeon)
**शेलार हॉस्पिटल, करमाळा येथे उपलब्ध !**

उपलब्ध सुविधा
- म.ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार
- कंबरदुखी, पायदुखी, डोकेदुखी
- अर्धांगवायु उपचार
- हातपायाला मुंग्या येणे
- जन्मजात व्यंग व उपचार
- लहान मुलांचे मेंदूचे उपचार
- मेंदूमध्ये रक्तस्त्राव उपचार
- दुर्बिणीद्वारे मेंदू व मणक्याची शस्त्रक्रिया
- बिनटाक्याची मणक्याची शस्त्रक्रिया

रविवार दि.१०/३/२०२४ सकाळी ११ ते १

- कर्मवीर जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी
- साई सुपरस्पेशालिटी सेंटर, बार्शी

बाळेश्वर नाका, यादव हॉस्पिटल शेजारी, बार्शी
संपर्क : 7620161520 / (02182) 220111



**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
**श्री कमलादेवी ऑप्टीकल्स** नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२



लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
**श्रीजी इस्टेट एजन्सी**
- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पत्ता : मेनरोड, करमाळा.



आशिर्वाद
कै.नवनाथ(तात्या) केकान
(माजी सदस्य, पंचायत समिती)
सावंत गटाचे नेते
मा.सुनील(बापू) सावंत
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
12 March
विजय(भाऊ)-लावंड
शशीभाऊ केकान
शुभेच्छुक
केकान परिवार, करमाळा.


12 March
आमचे मित्र
मा.सुनील(बापू) सावंत
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
समर्थ ट्रेडर्स & प्लंबिंग
जामखेड रोड, करमाळा. (प्रोप्रा : विकी पलंगे)


विनम्र अभिवादन
करमाळा भूषण
विनम्र अभिवादन
करमाळा भूषण, माजी नगराध्यक्ष
आदिनाथ कारखाना व करमाळा अर्बन बँकेचे माजी चेअरमन आणि
नागरीक संघटनेचे संस्थापक/अध्यक्ष
आदरणीय स्व.गिरधरदासजी देवी(भई) यांच्या १० मार्च पुण्यतिथी व
११ मार्च रोजी असलेल्या जयंतीनिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !
अभिवादक : नागरीक संघटना करमाळा शहर


विद्या विकास मंडळ या संस्थेचे विश्वस्त
व आमचे मित्र
श्री.आशुतोष(रिंकुभैय्या) घुमरे
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
किल्ला विभाग मित्र मंडळ
करमाळा, जि.सोलापूर
श्री.ज्ञानेश पाटोळे
(चेअरमन, विलासराव घुमरे पतसंस्था)
(व्यवस्थापक, दिगंबरराव बागल पेट्रोलियम)


उद्योजक
चेअरमन
विद्या विकास मंडळ या संस्थेचे
विश्वस्त व युवा उद्योजक
श्री.आशुतोष घुमरे
व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
सेवकांची सह.पतसंस्थेचे चेअरमन
प्रा.हनुमंत भोंग सर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
गणेश वळेकर, करमाळा.


विनम्र
अभिवादन
आपण दिलेल्या
विकासाच्या दृष्टीकोनातूनच,
आज आम्ही आमची पाऊले टाकीत
आहोत। 'भई' तुम्ही दिलेल्या आदर्शानूसार
भावी जीवनाची वाटचाल करत आहोत ॥
आदिनाथ कारखान्याचे माजी चेअरमन, माजी नगराध्यक्ष
करमाळा अर्बन बँकेचे माजी चेअरमन , करमाळा भूषण व आमचे मार्गदर्शक
कै.गिरधरदास देवी (भई) यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !
अभिवादक
श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित
श्री गिरधरदास देवी विद्यालय, करमाळा.
श्री.एस.एम.जगताप(मुख्याध्यापक), श्री.नरतवडेकर जे.डी., सौ.ए.जी.रंदिल,
श्री.आर.के.चिखले, श्री.जे.के.शिंदे, श्री.एस.आर.गलांडे, श्री.ए.बी.नेटके, श्री.सी.बी.खटके
श्री.डी.एच.पवार, श्री.एस.एन.जगताप, श्री.एस.बी.फुलारी(लिपीक),
श्री.एम.व्ही.कांबळे (प्र.प), श्री.एल.डी.टेकाळे(नाईक), श्री.डी.पी.माने, श्री.एस.टी.पवार


कै.शंकरराव येवले
स्व.सौ.मिनाक्षी शंकरराव येवले
आय.बी.पी.एस. मार्फत घेण्यात
आलेल्या स्पर्धा परीक्षेतून
करमाळा येथील रहिवाशी
ॲड.कुणाल उदय येवले
यांची बृहन्मुंबई महानगरपालिका(BMC)
मध्ये सहाय्यक विधी अधिकारी वर्ग-२
या पदावर निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• यशराज गणेश आर्ट, कुंभारवाडा
• केसर एंटरप्राईजेस, कर्जतरोड, नागोबा मंदिरजवळ, करमाळा.
• सुरज भोसले, सौ.राधिका भोसले
• सौ.अर्चना गितेश लोकरे • सुनील सावरे
• महेंद्र पाटील (बिटरगाव)
• बापू पाटील (पोलीस पाटील - रावगाव)

# विधानसभेसाठी महेश चिवटे यांना ताकद देणार : आमदार शहाजीबापू पाटील

करमाळा(सं.प्र.) : शिवसेना जिल्हाप्रमुख तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य महेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळा व नागरी सत्कार समारंभाला उपस्थित खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, शिवसेना प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे, मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, जिल्हा संपर्कप्रमुख मनिष काळजे, चरणराज चौरे, तालुका संपर्कप्रमुख रवी आमले, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, चिखलठाण सोसायटीचे विकास गलांडे, उद्योजक पंढरीनाथ साटपे, रामभाऊ पवार, निखिल मुंडे, सोलापूरचे सामाजिक कार्यकर्ते रसुल पठाण, अंबरनाथचे श्रीकांत पवार, पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते माधवराव जाधवर, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे आदी पदाधिकारी उपस्थित होते.





महेश चिवटे यांच्या सत्कारासाठी करमाळा तालुक्यातील जनतेने मोठी गर्दी केली होती. विशेषत: महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती. यावेळी बोलताना शिवसेना प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे म्हणाल्या, की महेश चिवटे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. एखादा निर्णय घेतला तर ते माघार घेत नाहीत व अन्याय सहन करत नाहीत; हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य असून ते कोणापुढे आपला स्वाभिमान गहाण ठेवत नाहीत.

यावेळी खासदार नाईकनिंबाळकर यांनी तालुक्यातील रिटेवाडी उपसासिंचन योजना सुरू करण्यासाठी महेश चिवटे यांनी केलेला पाठपुरावा फळाला येणार असून, येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकी अगोदर या प्रकल्पाचे भुमीपूजन होईल; असे आश्वासन दिले. चिवटे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उपस्थित सर्व जिल्ह्यातील व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत महेश चिवटे यांना ताकद द्या; असे आवाहन सर्वांनी केले.

यावेळी सोलापूरचे सामाजिक कार्यकर्ते रसुल पठाण यांनी शंभर किलो वजनाच्या गुलाबाच्या फुलांचा हार सत्कारासाठी आणला होता. महिला आघाडी जिल्हाप्रमुख आरती बसवंती, उपजिल्हाप्रमुख ज्योतीताई वाघमारे, युवा सेना-शिवसेना सर्व पदाधिकारी बरोबरच आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान सांगोला मतदार संघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी शुभेच्छा देताना महेश चिवटे हे कार्यशील व दमदार नेतृत्व असून करमाळ्याला अशा कर्तृत्वशील नेतृत्वाची नितांत आवश्यकता आहे. आगामी विधानसभेसाठी आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. त्याचबरोबर ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा चालवणाऱ्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत महाआरोग्य शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीरामध्ये मोफत ईसीजी तपासणी, विशेष करून महिलांसाठी कर्करोग तपासणी, मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप, जनरल तपासणी, हाडांची ठिसुळता व यूरिक ॲसिड तपासणी, लहान मुलांची तपासणी, मोफत औषधी वाटप करण्यात आले. सदर आरोग्य शिबीराचा लाभ ७०० हून अधिक नागरीकांनी घेतला तर ४०० हून अधिक जणांना मोफत चष्माचे वाटप करण्यात आले.




**रविराज हायटेक प्रा.लि;**
(निर्यातुभिमुख कंपनी)

**रविराज कॉर्न प्रॉडक्स् प्रा.लि.**
(शेतीमालावर प्रक्रिया करणारी कंपनी)

**कुशल कामगार पाहिजेत**

पोफळज, ता.करमाळा., जि.सोलापूर येथे सुरू झालेल्या आमच्या नामांकित, प्रथितयश, निर्यातुभिमुख इंजिनिअरींग व शेतीमालावर प्रक्रिया करत असलेल्या उद्योगासाठी खालील नमूद पदासाठी पात्र व सक्षम पुरूष व महिला कुशल उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | पदाची संख्या | पदाची नियुक्ती |
|---|---|---|---|
| विविध पदांसाठी शिकावू उमेदवार | १० वी, १२ वी, आय.टी.आय., इंजिनिअरींग डिप्लोमा, पदवीधर (बी.एस्सी) | ४५० | सुरू झालेली आहे |

तरी सक्षम उमेदवारांनी आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज व कागदपत्रे खालील मेल आयडी वरती पाठवावीत किंवा कंपनीच्या ऑफिसमध्ये १५ मार्च नंतर समक्ष येवून भेटावे..!

ceo@ravirajcorn.com
rajendrapawar@ravirajhitech.com

**पत्ता : लक्ष्मणनगर, गट नं.२२, पोफळज, ता.करमाळा.**

# विनम्र अभिवादन





तुमच्या स्मृतीने घेऊ स्फुर्ती,
तुमच्या सत्कार्याची करू पूर्ती
आमच्या हृदयी तुमची मूर्ती,
परमेश्वर देवो तुम्हांस चिरशांती..!

13 March

लोकनेते व माजी राज्यमंत्री

## स्व.दिगंबररावजी बागल (मामा)

यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !

**शोकाकुल**

**प्रगती विद्यालय, मांगी**
प्राचार्या - अनुपमा देवकर
(सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**दिगंबरराव बागल माध्य. विद्यालय, कुंभेज**
मुख्याध्यापक - हनुमंत पाटील
(सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**श्री आदिनाथ माध्य व उच्च माध्य. विद्यालय, आदिनाथनगर**
प्राचार्य - कांतीलाल माने (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)
**दिगंबरराव बागल मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, आदिनाथनगर** पो.जेऊर, ता.करमाळा.

# तोंडातील कर्करोगाचे वाढते प्रमाण !

आपण जर शरीराच्या सर्व कर्करोगाचे प्रमाण बघितले तर तोंडातील कर्करोगाचे किंवा कॅन्सरचे प्रमाण हे जवळ जवळ १२ ते १५ टक्के एवढे असून ही एक चिंतेची बाब आहे. प्रामुख्याने तोंडातील कर्करोग किंवा कॅन्सर हा काही ना काही व्यसनांमुळे होतो. त्यामध्ये प्रामुख्याने तंबाखू, गुटखा, सिगारेट, दारू, सुपारी यांच्या अतिसेवनामुळे होतो. काही प्रमाणात हा आजार खराब दात, टोचणारे तुटलेले दात, हिरड्यातून रक्त व पु बऱ्याच काळापासून येणे व त्याकडे दुर्लक्ष करणे तसेच किडलेले दात व त्यामुळे होणाऱ्या हाडातील गाठी किंवा त्यापासून होणारे हिरड्यांचे आजार यामुळेही तोंडातील कर्करोग होऊ शकतो.

तोंडातील कर्करोगामध्ये हिरडीचा, गालाचा, जिभेचा, टाळ्याचा कर्करोगाचे प्रमाण खूपच आहे. आजपर्यंत माझ्या २३ वर्षाच्या प्रॅक्टीसमध्ये तोंडातील कर्करोगाचे हजारो रूग्ण मी पाहिलेले आहेत. असाच एक रूग्ण मला आठवतो आहे, त्यास तंबाखुमूळे त्याच्या गालातील आतील बाजूस कि जिथे तो तंबाखू ठेवत होता त्या ठिकाणी एक पांढरा डाग किंवा पॅच होता. त्यावेळी मी त्यांना सांगितले, की तंबाखू बंद करा जेणेकरून तो डाग वाढणार नाही व त्याचे कर्करोगामध्ये रूपांतर होणार नाही. कारण पांढरा डाग किंवा पॅच दिसणे ही कर्करोगाची सुरूवात असते. या स्टेजला पेशंटने व्यसन बंद केले तर तो डाग किंवा चट्टा नॉर्मल होऊ शकतो. पण जर व्यसन चालू ठेवले तर शरीर एक नवीन प्रकारच्या पेशी तयार करते की ज्याला आपण कॅन्सर किंवा कर्करोग म्हणतो. याही पेशंटला मी सर्व समजावून सांगितले होते, पण त्यांनी ऐकले नाही. जेव्हा तो पेशंट सहा महिन्यांनी परत माझ्याकडे दात हालत आहे आणि काढून टाका.. यासाठी आला तेव्हा पाहिले तर त्याला त्याच ठिकाणी मोठी गाठ दिसून आली की जी पूर्णपणे पसरलेली होती. जेव्हा मी पेशंटला स्कॅन करून दाखवले त्यावेळी त्याने सांगितले की, डॉक्टर तुम्ही मला सहा महिन्यापूर्वी तंबाखू बंद करण्यास सांगितले होते पण मी ऐकले नाही. आणि तो





अक्षरश: रडू लागला. कारण कॅन्सर म्हटले की प्रचंड वेदना, त्रास आणि मरण असेच विचार रूग्णास येतात. जेव्हा त्या गाठीचा तुकडा काढून तपासला तर त्यामध्ये कॅन्सरच्या पेशी आढळल्या व जो कर्करोगासाठी उपचार असतो म्हणजे ऑपरेशन, केमोथेरपी, रेडिओथेरपी या सर्वांमधून रूग्णास जावे लागते. एकंदर हे सर्व उपचार घेत असताना प्रचंड वेदना, मानसिक व शारिरीक त्रास, घरच्यांना व नातेवाईकांना त्रास व खर्च होत असतो. एक मुख रोग किंवा तोंडाचा तज्ञ म्हणून जेव्हा रोज पेशंट पाहत असतो, त्यावेळी असे लक्षात येत आहे की हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. कर्करोगाचे जास्त पेशंट पाहायला मिळत आहेत आरि अगदी कमी वयातीलही पेशंट पाहायला मिळत आहेत; ही नक्कीच खूपच गंभीर बाब आहे.

एक मध्यम वयाच्या मावशी होत्या. त्यांच्या आईला कॅन्सर होता, तिच्या आईची सर्व जबाबदारी या मावशीवर होती. वर्षभरापासून या मावशीला तोंडात गाठ होती पण आईच्या कॅन्सरच्या आजारपणामुळं तिला एक वर्षापासून स्वत:ला त्रास असूनही दवाखान्यात येता आले नाही. वर्षानंतर जेव्हा तिची आई देवा घरी गेली तेव्हा ती दवाखान्यात आली. तपासल्यानंतर असे लक्षात आले की ही कॅन्सरची गाठ आहे. तुकडा काढून तपासले असता ती कॅन्सरची गाठ निघाली. म्हणजे तिच्या आई कॅन्सरने गेली आणि तिला स्वत:ला पण कॅन्सर झाला. आईला वाचवायला गेली आणि स्वत:लाही तोच आजार झाला, हे सर्व बघून व ऐकून डोळ्यात अक्षरश: पाणी आले. म्हणजे आजही आपण स्वत:कडे किती दुर्लक्ष करतो याचे हे उदाहरण आहे. हेच जर आपण सुरूवातीच्या स्टेजमध्ये किंवा लवकर दवाखान्यात दाखवले व योग्य ते उपचार घेतले तर जीव वाचण्याची शक्यता खूप वाढते. यासाठी डॉक्टरांबरोबरच सामाजिक संस्था किंवा जे कोणी कॅन्सरसाठी काम करतायेत त्यांनी प्रबोधन करणे गरजेचे आहे. यामध्ये मुख्यत्वे तोंडाचे डॉक्टर्स किंवा दंतरोग तज्ञ यांना सामावून घेतले पाहिजे. मोठ्या प्रमाणावर आरोग्य तपासरी वेळोवेळी झाली पाहिजे व्यसनांवर प्रबोधन झाले पाहिजे. सरकारच्या माध्यमातून शासनस्तरावर खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न होणे गरजेचे आहे.

जेव्हा घरात एखादा तोंडाचा कॅन्सरचा रूग्ण असतो किंवा कुठल्याही कॅन्सरचा रूग्ण असतो तेव्हा ते संपूर्ण कुटूंब खूप साऱ्या मानसिक तणावातून जात असते. तोंडाच्या कॅन्सरच्या पेशंटचा विचार केला तर जबड्याचा काही भाग, कधी कधी संपूर्ण जबडा काढलेला असतो. त्यामुळे चेहरा विद्रुप होतो. अशा रूग्णास नीट खाता येत नाही, नीट बोलता येत नाही. समाजात वेगळ्या नजरेतून बघितले जाते आणि काही वेळा काही रूग्णास पुन्हा दुसऱ्या ठिकाणी हा आजार होतो. त्यावेळी मात्र तो रूग्ण पूर्ण खचून जातो. परत ऑपरेशन व सर्व उपचार घ्यावा लागतो. प्रचंड वेदना नकोशा होतात आणि काही दिवसांनी तो रूग्ण दगावतो. आम्ही पूर्ण बरे झालेले रूग्ण पण बघितले आहेत की जे वेळीच दवाखान्यात आले, लवकर निदान करून योग्य ते उपचार घेतले आहेत त्यांचे प्राण वाचले आहेत.

नुकताच आमच्या सारंगकर डेंटल क्लिनिकमध्ये आम्ही जबड्याचा सीटी स्कॅन व इंट्रा ओरल स्कॅनची सुविधा उपलब्ध केली आहे. जेणेकरून लवकर निदान व्हावे व तातडीने रूग्णास उपचार मिळावेत; हा एकमेव हेतू आहे. तोंडातील कर्करोग किंवा कॅन्सर टाळण्यासाठी आपण कुठलेच व्यसन केले नाही पाहिजे किंवा बंद करायला पाहिजे. आपले मौखिक आरोग्य व्यवस्थीत ठेवले पाहिजे. किमान सहा महिन्यातून एकदा आपल्या तोंडाची तपासणी करून घेतली पाहिजे. खराब, किडलेले किंवा तुटलेले दातांचा वेळीच उपचार केला पाहिजे. दात टोकरने किंवा तुटलेले टोचणारे दात तोंडात ठेवणे टाळले पाहिजे. हिरड्यातून रक्त पु येत असेलतर त्याचा वेळीच उपचार घेतला पाहिजे.

एकंदर या सर्व गोष्टी आपण आचरणात आणल्यातर निश्चितच आपण कॅन्सरसारख्या आजाराला लांब ठेवू शकतो व आपले आयुष्य वाढवू शकतो..!

**...डॉ.चंद्रकांत सारंगकर**
**(दंतरोग तज्ञ)**
**सारंगकर डेंटल क्लिनिक, करमाळा.**

# महिला दिन




एक दिवस साजरा होतो 'महिलादिन'
वर्षभर मात्र ती ठरते केवळ दीन ।।धृ।।
रांधा, वांदा, उष्टी काढा
फक्त एवढेच बाकी सोडा
सांभाळावे तिने चूल आणि मुल
सोबतीला आणखी हिणकस बोल
स्त्रीजात म्हणून तिने फक्त फेडायचं रीन ।।१।।
गल्ली ते दिल्ली तऱ्हा एकच
कुठेच फरक नाही तिच्या बाबत
समजतात तिला पायातली वहान
साधन मानतात तिला भागवायची तहान
अन्याय अत्याचार ती कुठवर सोशीन ।।२।।
समानता राहिली कागदावर फक्त
किती जणींनी आणखी सांडवो रक्त
भस्म झाल्या जळून कित्येक 'निर्भया'
कधी येईल तुम्हाला 'आयशा' ची दया
प्रतिशोध तिचा कोण पूर्ण करीन ।।३।।
घर, गाव, शहर नि नगरात
सुरक्षित नाही ती भर बाजारात
मान, सन्मान, आदर राहिला दूर
मनात तिच्या कायम बेनाम काहूर
कधी संपेल तिच्या डोक्यामागचा शीण ।।४।।
पेरावे लागतील तिलाच संस्कारांचे मोती
समजून घ्यावी लागेल जिजाऊंची महती
तरच येईल तिच्या आयुष्यात सुदिन...
एक दिवस साजरा होतो महिलादिन
वर्षभर मात्र ती ठरते केवळ दीन।

**....किर्ती पांडूरंग भापकर** (उपशिक्षिका, वरकटणे)
**मो.९१४५७७३४०५**

## महादेवाच्या नंदीची १२ मार्चला मिरवणूक

करमाळा(सं.प्र.) : महाशिवरात्री निमित्त सालाबादप्रमाणे याही वर्षी १२ मार्चला सायंकाळी ५ वा ५५ मि. किल्लावेस येथील श्री खोलेश्वर महादेवाच्या नंदीची खांद्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य काढण्यात येणार आहे. तरी यामध्ये सर्व स्तरातील नागरीकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**स्थलांतर.. स्थलांतर.. स्थलांतर..**
**शांतिसागर बँगल्स् स्टोअर्स**
हे दुकान आता **सुभाष चौक जवळ, दत्तपेठ, करमाळा**
येथे चालू आहे.
लग्नाच्या बांगड्या होलसेल भावात मिळतील.
**फंडगल्ली येथील तीन मजली बिल्डींग विकणे आहे**
**संपर्क : 9766075378**

डॉ.नायकुडे यांचे **डोळ्यांचा दवाखाना** **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

## माढा लोकसभा मतदारसंघात
# महायुतीमधून राष्ट्रवादी काँग्रेसला उमेदवारी द्यावी : भरत आवताडे



करमाळा(सं.प्र.): माढा लोकसभा मतदार संघासाठी महायुतीमधून राष्ट्रवादी काँग्रेसला उमेदवारी देण्यात यावी; अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत आवताडे यांनी केली आहे. याबाबत बोलताना ते म्हणाले, की राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा मतदारसंघ आहे. हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला मानणारे विकासप्रिय आमदार संजयमामा शिंदे हे करमाळ्याचे नेतृत्व यशस्वीपणे करत आहेत तर माढा मतदारसंघातून त्यांचे ज्येष्ठ बंधू बबनदादा शिंदे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत आमदार म्हणून काम करत आहे. याचबरोबर सांगोल्यातून माजी आमदार दिपक साळुंखे यांचेही सांगोल्यामध्ये जनमाणसांमध्ये राष्ट्रवादीबद्दल विशेष प्रेम व जिव्हाळा असल्याने ते राष्ट्रवादीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रतिनिधीत्व करत आहेत. त्याचबरोबर माण येथे रामराजे निंबाळकर त्यांच्या भागात राष्ट्रवादी काँग्रेसचे यशस्वीपणे नेतृत्व करत आहेत. तर माळशिरसमधून उत्तम जानकर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची ताकद वाढली आहे. एकंदर माढा लोकसभा मतदार संघ हा राष्ट्रवादी काँग्रेसला मानणारा मतदारसंघ आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राबल्य असणारा हा मतदारसंघ महायुती मधून राष्ट्रवादी काँग्रेसलाच सोडण्यात यावा; अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत आवताडे यांनी महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार तसेच मित्र पक्षाचे नेते यांचेकडे केली आहे. शिवसेना भाजप मित्रपक्षांची या मतदारसंघामध्ये भक्कम साथ लाभणार असल्याने विरोधकांचा कुठल्याही प्रकारचा करिश्मा चालणार नाही. त्यामुळे आपण केलेल्या मागणीचा विचार करून माढा लोकसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसला दिल्यास येथील उमेदवाराचा विजय निश्चीत आहे. विक्रमी मताने माढा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार विजय होईल; असाही विश्वास राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष भरत आवताडे यांनी व्यक्त केला आहे.

# इरा पब्लिक स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



करमाळा (सं.प्र.): चिखलठाण येथील इरा पब्लिक स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साही वातावरणात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाची सुरूवात राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी उद्योगपती सतीश सुराणा, सरपंच धनश्री गलांडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, माजी सरपंच चंद्रकांत सरडे, माजी उपसभापती दत्तात्रय सरडे, कुगावचे सरपंच महादेव पोरे, गुरूकुल पब्लिक स्कुलचे नितीन भोगे, इरा पब्लिक स्कुल टेंभूर्णीचे महेंद्र वाकसे, सचिन पवार, राजेश शुक्ल, गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, राजकुमार राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. या स्नेहसंमेलनात इरा पब्लिक स्कुल मधील विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सादरीकरणाने तर आसमंत उजळून निघाला. रामायण व चंद्रयान या नृत्यांनी तर अद्भूत वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द पध्दतीने केले. सर्व गाणी सादरीकरण होईपर्यंत प्रेक्षकांनी आपली जागा सोडली नाही. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व वाहन चालक बंधू यांनी परिश्रम घेतले.

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना
Smile with confidence
उपलब्ध सुविधा...
● इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
● डिजीटल एक्स-रे
● अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
● वेदनारहित दात व दाढ काढणे
● पडलेले दात बसविणे
● दात साफ करणे
● दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे
डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस. (डेन्टल सर्जन)
उपलब्ध सुविधा...
● स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
● अक्कलदाढ काढणे
● वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
● अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
● हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
● कॉस्मेटिक ट्रिटमेंट
● कर्करोगाचे निदान
● गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी
महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# नवभारत इंग्लीश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल व ट्विंकलींग स्टार्सचे वार्षिक स्नेहसंमेलन १ मार्चला विकी मंगल कार्यालय येथे उत्साही वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार शिल्पाताई ठोकडे या होत्या. प्रमुख पाहूणे म्हणून युवा नेते यशवंतभैय्या शिंदे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, शिक्षण विभागाचे प्रमुख नीळ, संस्थेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, संचालक अमोद संचेती, विजयकुमार दोशी, सुनिता देवी, ललिता वांगडे, महादेव फंड, डॉ.कविता कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रशालेचे २०२३ मध्ये दहावी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सुनीता देवी यांचा सत्कार तहसीलदार ठोकडे यांचे हस्ते करण्यात आली. याप्रसंगी साहित्यिका अंजली श्रीवास्तव यांनी शाळेस पुस्तकांचा काव्यसंग्रह भेट दिला. सुंदर असे कथक नृत्य आणि गणेश वंदना करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. नर्सरी ते नववी मधील मुलांनी मोठ्या प्रमाणावर यामध्ये आपला सहभाग नोंदवला. रंगीबेरंगी कपड्यांमध्ये सजलेले बालगोपाल तसेच कार्यालयाची केलेली सुंदर अशी सजावट याने एकंदरीत वातावरण उत्साहाचे झाले होते. नर्सरी ते चौथी मधील विद्यार्थ्यांनी रामलीला थीम वापरून आपली गाणी सादर केली. चंद्रयानावर आधारीत गाणे, देशभक्तीपर गाणे, तमिळ साँग, मराठी गाणी, पोवाडा अशा वेगवेगळ्या प्रकारच्या गाण्यांवर नृत्य सादर करण्यात आले. मोबाईलचे उपयोग व दुरूपयोग यावर आधारीत एक ड्रामाही सादर करण्यात आला. सुंदर अशा ढोलपथकाने तर पूर्ण वातावरण दुमदूमुन सोडले होते. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सुत्रसंचालन अश्विनी देशमाने यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुनिता मोहिते यांनी मानले.

JK Design Studio
आर्किटेक्ट | इंजिनियर्स | इंटेरियर
● आर्किटेक्चर ड्रॉईंग ॲन्ड डिझाईन (वास्तुशास्त्रनूसार)
● रेसिडेंशियल, कमर्शियल, इंडस्ट्रियल
● स्टील डिझाईन ● बिल्डिंग परवाना
● इंटेरियर डिझाईन ● बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
● लॅन्डस्केप डिझाईन ● कन्सल्टन्सी
Architecture | Interior | construction
Er.Irshad M. Kazi (B.E.Civil) Mo.8421124858
Ar.Junaid M. Kazi (B.Arch) Mo.9975579996
पत्ता २६९०/३३९ गणेशनगर, करमाळा.
jkdesignstudio23@gmail.com
Jk_design_studio23

श्री गजानन अगरबत्ती
● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


आमदार
मा.सदस्य, पंचायत समिती
मा.नगरसेवक
उद्योजक
सावंत गटाचे युवा नेते
मा.श्री.सुनील(बापू) सावंत
आपणांस १२ मार्च रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री.नानासाहेब मोरे
शुभेच्छुक
गुरूदत्त एंटरप्रायजेस् करमाळा.


आशिर्वाद
आशिर्वाद
12
March
सावंत गटाचे युवा नेते
पै.सुनील(बापू) सावंत
यांना वाढदिवसानिमित्त लाख.. लाख.. हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
आनंद इलेक्ट्रीकल्स
पोथरनाका, करमाळा.
आमच्याकडे इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मरचे सर्व साहित्य
तसेच एलईडी दिवे दुरूस्त करून मिळतील.
प्रोप्रा : आनंद रोडे , मो.9421023284


खुशखबर..! खुशखबर..!! खुशखबर !!!
करमाळा शहरामध्ये पुणे रोड, मुथानगर येथे
सर्व अद्ययावत सुखसुविधांनी परिपूर्ण असे
रणविजय लॉजींग
● प्रशस्त सुट, AC व Non AC रूम.
● अॅटेज बाथरूम ● गरम पाण्याची सुविधा
● खालच्या मजल्यावरती Veg / Non Veg हॉटेल रेस्टॉरंट
● २४ तास पाणी व लाईटची व्यवस्था
● पार्किंगसाठी प्रशस्त जागा ● निसर्गरम्य ठिकाण

# आंतरशालेय क्रिडा स्पर्धेत नामसाधना शाळेचे सुयश



करमाळा(सं.प्र.) : नगरपालिका शिक्षण मंडळ करमाळा यांचे वतीने आयोजित आंतरशालेय क्रिडा महोत्सवात विविध क्रिडा स्पर्धेत नामसाधना मुले नं.१ शाळेने सुयश संपादन केले आहे. कबड्डी मध्ये शाळेने अंतिम विजेतेपद मिळवले तर वैयक्तीक स्पर्धेत फक्त मुलांच्या शाळेसाठी असलेल्या १५ बक्षीसांपैकी १० बक्षीसे मिळवून सर्वोत्तम कामगिरी केली आहे.

**विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी...**

**लिंबू चमचा :** शिवांश लावंड (प्रथम), शर्विल मस्कर (द्वितीय), शौर्य राखुंडे (तृतीय)., **५० मीटर धावणे :** स्वानंद काळदाते (द्वितीय), यशराज पाटील (तृतीय). **लिंबू चमचा मोठा गट :** जय थाटे (द्वितीय), यशराज पाटील (तृतीय). **१०० मीटर धावणे :** प्रतिक शेरे (प्रथम), यशवर्धन देशमुख (द्वितीय). **तीन पायाची शर्यत :** सौरभ बागल, तन्मय कलाल. **शिक्षकांची संगीत खुर्ची :** सुरेखा यशवंत कांबळे (द्वित्तीय)

क्रिडा स्पर्धेतील खेळाडूंना नामसाधना शाळेच्या मुख्याध्यापिका सुनंदा जाधव, सुरेश कोळी, लालसाहेब शेरे, सुनिता शितोळे, सुनिता भैलुमे, धनश्री उपळेकर, मंगल गलांडे, सुषमा केवडकर, आशा अभंगराव, वैशाली जगताप, सुरेखा कांबळे, अश्विनी ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.











# SIDASH
## Stock Market Academy

**शेअर मार्केट शिकण्याची सुवर्णसंधी ! सुवर्णसंधी !!**

शेअर मार्केट शिका 'मराठी' मध्ये आणि दररोज कमवा Rs.1000/- ते 10,000/-

### आमची वैशिष्ट्ये..

- Online & Offline क्लासेसची सुविधा.
- महिला व मुलींसाठी स्वतंत्र बॅच.
- दररोज होणाऱ्या नियमित बॅचेस.
- प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष दिले जाते.
- Life Time Free Support & Counselling ची सुविधा.
- क्लास मध्ये दररोज चालू मार्केट मध्ये सराव करून घेतला जातो.
- तुम्हाला आलेली शंका चालु लेक्चरमध्ये क्लेअर केली जाते.
- Basic To Advance संपूर्ण ट्रेनिंग एकाच ठिकाणी.
- फ्री Dmat Account Opening ची सुविधा.
- ट्रेडींगमधून सर्वात कमीत कमी रिस्क घेऊन महिन्याचे ८% ते १०% फिक्स रिटर्न देणाऱ्या Strategies दिल्या जातात.
- प्रत्येक विद्यार्थ्याला Financially Free कसे होता येईल, याचा संपूर्ण प्लॅन त्या विद्यार्थ्याला त्याच्या कंडिशननुसार तयार करून दिला जातो.

**मर्यादित प्रवेश**

- येणाऱ्या १० वर्षात १ लाख रूपयांचे १ कोटी कसे करता येतील याचा संपूर्ण प्लॅन तयार करून दिला जातो.
- Longterm मध्ये प्रति वर्षाला १००% फिक्स रिटर्न देणाऱ्या बेस्ट Strategies Live मार्केटमध्ये १० वर्ष बॅक टेस्ट करून दिल्या जातात.
- जर आम्ही दिलेल्या Strategies ने तुमचे पैसे प्रति वर्षाला १००% नाही झाले तर कोर्ससाठी घेतलेली सर्व फी परत केली जाईल.
- संपूर्ण कोर्स झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार २५ लाखांपर्यंत आमच्या Account वरून १ फ्री ट्रेड करण्याची सुवर्णसंधी दिली जाते.
- ज्या विद्यार्थ्याला शेअर मार्केट या क्षेत्रामध्ये आपले करिअर करण्याची इच्छा आहे, अशा विद्यार्थ्यांना संपूर्ण ट्रेनिंग देऊन PortFolio Management या कामासाठी नोकरी दिली जाते. पगार (१८०००/-) दिला जातो.



प्रवेश देणे चालू आहे

दि.११ मार्च २०२४ पासून बेसिक क्लाससाठी नवीन बॅच सुरू..!

बेसिक क्लास फक्त Rs.500/- मध्ये

अधिक माहितीसाठी संपर्क
श्री.आशुतोष परदेशी मो.8877707878, 8975636223

पत्ता : चिवटे कृषी सेवा केंद्र, पहिला मजला, श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. ४१३२०३.